मंजुर 10/1/17

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी
# कल्याण उपविभाग कल्याण यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता :- मोहन प्राईड, सांस्कृतिक कल्याण केंद्र, दुसरा मजला, पोद्दार स्कुलच्या बाजूला, खडकपाडा, कल्याण (प) पिन नं. ४२१ ३०१

दुरध्वनी क्रमांक :- ०२५१-२२०१११८ E-mail :- kalyansdo@gmail.com

---

क्र.केडी/टे-७/कल्याण/विप/एसआर-०९/२०१६
दिनांक:- ०६/१२/२०१६

**वाचा :-**

१.जमिनमालक श्रीम. तुळसाबाई दत्तु काशिवले व इतर यांचे कु.मु.धा. श्री. काळुराम दत्तु काशिवले व श्री. रवि सदु काशिवले रा.नडगाव, ता. कल्याण, जि.ठाणे यांचा दिनांक २३/०३/२०१६ रोजीचा अर्ज व मंडळ अधिकारी नडगाव यांचे समक्ष हजर राहून लिहून दिलेला जबाब दिनांक २०/०४/२०१६.

२.मंडळ अधिकारी नडगाव, ता.कल्याण यांचेकडील क्र.मं.अ.न./वि.प./एस.आर- /२०१६, बानि-११९/२०१६, दि.२०/०४/२०१६ चा चौकशी अहवाल.

३.मौजे-खडवली, ता-कल्याण, येथील स.नं.६५, क्षेत्र ४-७७-५ हे.आर.प्र,पो.ख. ०-१४-२, एकुण क्षेत्र ४-९१-७ ह. आर.प्र.,यापुर्वी विक्री क्षेत्र ०-३५-० हे. आर.प्र., शिल्लक क्षेत्र ४-५६-७ हे.आर.प्र., पैकी विक्री क्षेत्र १-७०-० हे.आर..प्र., आकार २१.६२ या जमिनीचे ३२-ग आदेशाविरुध्द कोणत्याही न्यायालयात दावा चालू अथवा प्रलंबित नसलेबाबत जमिनधारक श्रीम. तुळसाबाई दत्तु काशिवले व इतर यांचे कु.मु.धा. श्री.काळुराम दत्तु काशिवले व श्री. रवि सदु काशिवले यांनी लिहून दिलेले दिनांक २३/०३/२०१६ चे सत्यप्रतिज्ञालेख. तसेच मंडळ अधिकारी नडगाव यांचे समक्ष हजर राहुन लिहुन दिलेला दिनांक २०/०४/२०१६ चा जबाब.

४.मौजे-खडवली, ता-कल्याण, येथील स.नं.६५, क्षेत्र ४-७७-५ हे.आर.प्र,पो.ख. ०-१४-२, एकुण क्षेत्र ४-९१-७ ह. आर.प्र.,यापुर्वी विक्री क्षेत्र ०-३५-० हे. आर.प्र., शिल्लक क्षेत्र ४-५६-७ हे.आर.प्र., पैकी विक्री क्षेत्र १-७०-० हे.आर..प्र., आकार २१.६२ ही जमिन श्रीम. तुळसाबाई दत्तु काशिवले व इतर यांनी श्री.काळुराम दत्तु काशिवले व श्री. रवि सदु काशिवले यांना शेती प्रयोजनार्थ जमीन विक्री करणेकामी कुणाची हरकत आहे किंवा कसे? तसेच जाहीर नोटीस प्रसिध्द करुन अहवाल सादर करणेकामी एसआर क्रमांक ०९/२०१६, दिनांक ०१/०४/२०१६ ची जाहीर नोटीस सदर जाहीर नोटीस प्रसिध्द केल्याचा तलाठी सजा-खडवली, ता-कल्याण यांचा दि.०२/०४/२०१६ रोजीचा अहवाल. तसेच तहसिलदार कल्याण यांचा दि.०३/०९/२०१६ रोजीचा अहवाल.

५.जमिनधारक श्रीम. तुळसाबाई दत्तु काशिवले व इतर हे आदिवासी नसलेबाबत तसेच प्रश्नांकित जमीन ही भूसंपादनात येत नसलेबाबत व सदर जमीनीस महाराष्ट्र खाजगी वन खात्याच्या तरतुदी लागू होत नसलेबाबत तसेच जमीन महसुली बाकी नसलेबाबत तलाठी सजा- खडवली, ता-कल्याण, जि.ठाणे यांचा दिनांक ०२/०४/२०१६रोजीचा दाखला.

६.जमीन खरेदी करणार श्री. काळुराम दत्तु काशिवले व श्री. रवि सदु काशिवले रा.मौजे नडगाव,पो. खडवली,ता.कल्याण, जि.ठाणे यांनी .मौजे-खडवली, ता-कल्याण, येथील स.नं.६५, क्षेत्र ४-७७-५ हे.आर.प्र,पो.ख. ०-१४-२, एकुण क्षेत्र ४-९१-७ ह. आर.प्र.,यापुर्वी विक्री क्षेत्र ०-३५-० हे. आर.प्र., शिल्लक क्षेत्र ४-५६-७ हे.आर.प्र., पैकी विक्री क्षेत्र १-७०-० हे.आर..प्र., आकार २१.६२ ही जमीन खरेदी केल्यावर त्यांचे नावे म.ज.क.जा.का.१९६१ चे तरतूदीनुसार जमीन ५४ एकर पेक्षा जास्त होत नसलेबाबत त्यांनी लिहून दिलेले दिनांक २३/०३/२०१६ चे सत्यप्रतिज्ञालेख व मंडळ अधिकारी नडगाव यांचे समक्ष दिलेला दिनांक २०/०४/२०१६ चा जबाब.

७.कार्यालयीन दिनांक २९/११/२०१६ ची मंजूर टिपणी.

**आदेश :-**

जमिन जमिनमालक श्रीम. तुळसाबाई दत्तु काशिवले व इतर यांचे कु.मु.धा. श्री. काळुराम दत्तु काशिवले व रवि सदु काशिवले यांनी दिनांक २३/०३/२०१६ च्या अर्जात नमूद केलेल्या खालील परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या जमीनीचे क्षेत्राची मुंबई कुळ वहिवाट व शेतजमिन कायदा १९४८ चे कलम ४३ (१) व तदअनुषंगिक मुंबई कुळ वहिवाट व शेतजमिन अधिनियम १९५६ च्या नियम २५ अ (१) (फ) अन्वये श्री. काळुराम दत्तु काशिवले व रवि सदु काशिवले रा.मौजे नडगाव, पो. खडवली, ता.कल्याण, जि.ठाणे यांना खालील अटी व शर्तीस अधिन ठेऊन शेती प्रयोजनासाठी जमिन विक्री करणेकामी कु.का.कलम ४३ ची शर्त शिथिल करण्याची परवानगी देणेत येत आहे.

१.जमीन खरेदीदाराने हया आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाचे आत जमीन मालकाबरोबर खरेदीखत पूर्ण केले पाहिजे व तसे केल्यापासुन पंधरा दिवसांचे आत निमस्वाक्षरी करणा-यास लेखी कळविले पाहिजे. तदनंतर जमीनीचा कब्जा कोणत्या तारखेला घेतला आहे याची माहिती त्वरीत कळविली पाहिजे.

२.जमीन खरेदीदाराला ज्या कारणासाठी जमिन विकत घेण्याची परवानगी देण्यात आली आहे त्याच कारणासाठी जमीनीचा कब्जा घेतल्या नंतर एक वर्षाचे आत वापर केला पाहिजे.

३.सदर जमीनीचा वापर ज्या कारणासाठी दिला आहे त्याच कारणासाठी वापर केला पाहिजे.

४.ही परवानगी वेळोवेळी राज्य शासनाचे /केंद्र शासनाचे प्रचिलत कायदे व नियम यांना अधिन राहून देण्यात येत आहे.

५.प्रकरणी सादर केलेल्या सन १९५४-५५ च्या ७/१२ उता-यात अपूर्ण पिक पहाणी अथवा मालकी हक्काबाबत भविष्यात काही दावे उदभवल्यास त्यास आताचे जमीन मालक व खरेदीने घेणार हे जबाबदार राहतील. तसेच इतर कुठल्याही नियमाचा भंग करुन अधिकार अभिलेख प्राप्त करुन घेतले असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विकत देणार व घेणार यांचेवर राहील.

६.सदर आदेशाविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास सदरची परवानगी रदद समजणेत येईल.

७.सदर जमिनीचे खरेदीखत झाल्यांतर अधिकार अभिलेखाच्या नियमाने त्याचा फेरफार सदरी अंमल देताना जमीन खरेदी करणार हे शेतकरी असलेबाबतचे अदयावत ठोस पुरावे संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकडे सादर करणे जरुरीचे व बंधनकारक राहील.

८.सदर जमीनीस कायदयाच्या इतर तरतूदी लागू होत असतील तर सदरची परवानगी आपोआप रदद होईल.

९.सदर जमीनीचे ७/१२ चे इतर हक्कात असलेला बोजा कमी करणेची जबाबदारी ही जमीन मालक यांची राहील.भविष्यात याबाबत वाद निर्माण झालेस त्यास जमीन मालक हे सर्वस्वी जबाबदार राहतील. तसेच बोजा संपूर्ण फेड केल्यानंतरच जमीन हस्तांतरणाची पुढील कायदेशीर कार्यवाही करणेत यावी.

१०.वर उल्लेखिलेल्या कोणत्याही एका शर्तीचा किंवा कायदयाचा भंग केल्याचे आमचे निदर्शनास आल्यास ही परवानगी रदद झाली आहे, असे समजणेत येईल व कुळ वहिवाट व शेतजमीन कायदा कलम ८४-क किंवा ८४-क (क) यथास्थिती अन्वये पुढील कायदेशीर कारवाई सुरु करण्यात येईल.

११.सदरची परवानगी केवळ मुंबई कुळ वहिवाट व शेतजमिन कायदा १९४८ चे कलम ४३ (१) व तदअनुषंगिक मुंबई कुळ वहिवाट व शेतजमिन अधिनियम १९५६ च्या नियम २५ अ (१) (फ) च्या तरतुंदीपुरती देण्यात येत आहे. प्रस्तुतचा परवानगीनंतर प्रत्यक्ष व्यवहार नोंदणीकृत करतेवेळी सर्व हितसंबंधितांची हस्तांतरणास मान्यता असल्याची खात्री दुय्यम निबंधक यांनी घेण्याची आहे. तसेच वैधरित्या नोंदणीकृत दस्त प्राप्त झाल्यानंतर फेरफार नोंद मंजुर करणेपूर्वी आवश्यक जरुर ती कागदपत्रे (उदा.शेतकरी दाखला इत्यादी) नियत पध्दतीने तपासुन त्यानंतर अधिकार अभिलेखाबाबत कार्यवाही करण्याची दक्षता तलाठी/मंडळ अधिकारी यांनी घेणेची आहे.

१२.जमीन मालकाने दिनांक ०६/१२/२०१६ रोजी चलन क्र. ७८/२०१६ अन्वये रक्कम रु.८८०/- (अक्षरी रुपये आठशे ऐंशी फक्त) शासनास लेखाशिर्ष क्र.०.२९ एल.आर. अन्वये नजराणा म्हणुन जमीनीच्या शेतसा-याच्या ४० पट रक्कम भरली आहे.

| अ. क्र. | गावाचे नाव | स.नं. हि.नं./ गट नं. | क्षेत्र हे.आर.प्र. | एकुण क्षेत्र हे.आर.प्र | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव | जमिन खरेदी करणा-याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | खडवली ता. कल्याण | ६५ | ४-७७-५<br>पो.ख<br>०-१४-२ | ४-९१-७<br>यापुर्वी विक्री ०-३५-०<br>४-५६-७<br>पैकी विक्री क्षेत्र<br>१-७०-० | २१.६२ | श्रीम. तुळसाबाई दत्तु काशिवले व इतर | श्री. काळुराम दत्तु काशिवले व श्री. रवि सदु काशिवले. |

सही /-xxx

उपविभागीय अधिकारी,

कल्याण उपविभाग,कल्याण

प्रति,

१. श्रीम. तुळसाबाई दत्तु काशिवले व इतर रा. मौजे नडगाव, पो. खडवली,ता.कल्याण, जि.ठाणे.

२. श्री.काळुराम दत्तु काशिवले व श्री. रवि सदु काशिवले, रा.मौजे नडगाव, पो. खडवली, ता.कल्याण, जि.ठाणे.

३. तहसिलदार, कल्याण यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

४. मंडळ अधिकारी नडगाव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना

५. तलाठी सजा- खडवली, ता.कल्याण, जि.ठाणे.

२/- सदर जमिनीचे खरेदीखत झालेनंतर अधिकार अभिलेखाबाबत तरतुदींच्या अनुषंगाने फेरफार सदरी अंमल देताना प्रश्नांकित जमीन खरेदी करणार हे शेतकरी आहेत अगर कसे व ते त्या गावचे शेतकरी आहेत याबाबत संबंधित गावचे तहसिलदार यांचेमार्फत खात्री करुन मूळ जमीनधारक यांना नोटीस देऊन जरुर ती नियमोचित कार्यवाही करण्यात यावी.

उपविभागीय अधिकारी,

कल्याण उपविभाग,कल्याण